# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०४१ /२०१०

अर्जदार : श्री श्रीराम सीताराम भातकुलकर
राहणार कुभांरपेठ वार्ड नं. १४,
नरखेड,
जिल्हा नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
काटोल विभाग, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती :
1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्रीमती के.के घरत
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

— आदेश ——

पारीत दि. १९.०७.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक २०.०५.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१. अर्जदाराने कमी वापर असतांना सुध्दा, गैरअर्जदारातर्फे माहे ऑगष्ट २००९ ते डिंसेबर २००९ पर्यंत अवाजवी विद्युत देयके पाठविण्याबाबत व वेळेवर तक्रारीची दखल न घेण्याबाबत दिनांक २०.०५.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले, तसेच मंचाला विनंती केली की

अ) माहे ऑगष्ट २००९ ते डिसेंबर २००९ पर्यंतचे वापरानुसार सुधारीत देयक देण्यात यावे.

ब) माहे ऑगष्ट २००९ पासुन झालेल्या मानसिक व आर्थिक त्रासाबदद्ल नुकसान भरपाई देण्यात यावी.

२. अर्जदाराने मंचात सादर केलेल्या अर्जात असे म्हटले आहे की त्यांच्या घरी फक्त ९० वर्षाची म्हातारी आई राहते व घरात लाईट शिवाय कोणत्याही विजेच्या उपकरणाचा वापर नाही. तरीही माहे ऑगष्ट २००९ ते डिसेंबर २००९ पर्यंत अवाजवी विद्युत देयके देण्यात आली. तसेच अर्जदाराने दिनांक १२.१०.२००९ रोजी पहिल्यांदा कनिष्ठ अभियंता, नरखेड यांना ऑगष्ट व संप्टेबर २००९ मध्ये आलेल्या वाढीव देयका बाबत तक्रार अर्ज दिले होते व विनंती केली होती की विद्युत देयके कमी करून मिटरची चाचणी करण्यात यावी. पंरतु गैरअर्जदारांतर्फे सदर अर्जाची कुठलीही दखल घेण्यात आली नाही.

३. अर्जदाराने पुढे असेही नमुद केले की त्यांना पुन्हा आक्टोबर २००९ मध्ये वाढीव देयके देण्यात आले त्यावर सुदधा अर्जदाराने गैरअर्जदाराला १७.११.२००९ व १९.११.२००९ या तारखांना पत्राव्दारे कळविले.

तेव्हा दिनांक १९.११.२००९ रोजी गैरअर्जदारातर्फे मिटरची पाहणी करण्यात आली व अर्जदाराला सागंण्यात आले की अर्थिंग वायर मिटर मध्ये जोडल्याने मिटर नोंदी जास्त घेत आहे, असे

अर्जदाराने आपल्या अर्जात नमुद केले आहे. पुढे अर्जदाराने कनिष्ठ अभियंता, नरखेड यांच्या सांगण्यावरून मिटर चाचणी फी रूपये १००/— भरणा केल्यानंतर गैरअर्जदाराने तक्रार असलेले मिटर काढुन दुसरे मिटर लावले व काढलेल्या मिटरची चाचणी केली. परंतु अर्जदाराने असेही नमुद केले आहे की या विषयी अर्जदारास कुठलीही माहिती देण्यात आली नाही व २५.१२.२००९ रोजी अर्जदाराला थकबाकीपोटी विद्युत पुरवठा खंडीत करण्याची नोटीस पाठविण्यात आली. यावर २७.१२.२००९ रोजी अर्जदाराने सहाय्यक अभियंता, नरखेड यांना सुधारीत देयक भरण्यास तयारी असल्याची कबुली दर्शवून, विद्युत पुरवठा खंडीत न करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदाराने पुढे असे ही म्हटले आहे की त्याने केलेल्या तक्रारीवर काहीही उत्तर न देता विज पुरवठा खंडीत करण्याबाबत दोनदा नोटीस देण्यात आली तसेच नविन मिटर लावल्यापासुन विद्युत देयके बरोबर येत आहे. पुढे अर्जदाराने आपल्या अर्जात मंचाला विनंती केली वापरलेल्या विजेच्या विद्युत देयक भरण्यास अर्जदार तयार आहे, परंतु त्याला ऑगष्ट २००९ ते डिसेंबर २००९ या काळाचे विद्युत देयके कमी करून सुधारीत देयके देण्यात यावी व झालेल्या मानसिक व आर्थिक त्रासाबददल नुकसान भरपाई देण्यात यावी.

५. गैरअर्जदाराने आपले उत्तर दिनांक २१.०६.२०१० रोजी दाखल केलेले असुन अर्जदाराच्या तक्रारीची दखल ताबडतोब घेतल्याबददल नमुद केले आहे. त्यांच्या उत्तरात पुढे असेही नमूद केले आहे की अर्जदाराचा मिटर क्रं. ०९१२२६ हा असुन त्याची तपासणी दिनांक १८.११.२००९ रोजी केलेली आहे. अर्जदाराला एकुण रूपये ४,२३०/— रूपयाचा विद्युत देयक मिटर रिडींग प्रमाणे दिलेले आहे. सदर विद्युत

देयके अर्जदारास मान्य नसल्यामुळे त्यांच्या विनंतीनुसार मिटर तपासणी करीता डिंमाड देण्यात आले होते.

अर्जदाराचे जुने मिटर चाचणी करीता काढुन त्या जागी नविन मिटर लावण्यात आले आहे. दिनांक ०२.०२.२००९ रोजी जुन्या मिटरची चाचणी करण्यात आली व चाचणी अहवालाची प्रत अर्जदारास देण्यात आली आहे. सदर अहवालाप्रमाणे जुने मिटर बरोबर फिरत असल्याचे दिसुन येते. त्यात कसलाही दोष न आढळ्ल्यामुळे त्यांना देण्यात आलेले विद्युत देयक योग्य आहे, असे गैरअर्जदाराने आपल्या लेखी अभिप्रायामध्ये नमुद केले आहे.

६. गैरअर्जदाराने पुढे असेही नमुद केले आहे की, दिनांक १८.११.२००९ रोजी मिटरची तपासणी केली असता मिटरची वायरींग बरोबर केलेले होते. तसेच मिटरची वायरींग चुकीची लावल्यास एकतर मिटर बंद पडेल किंवा विद्युत पुरवठा खंडीत होईल. तसेच मिटरच्या वायरींगचा मिटरच्या नोंदीत वाढ किंवा घट होण्याशी काहीही संबंध नसतो.

७. दिनांक २१.०६.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते, गैरअर्जदारातर्फे कनिष्ठ अभियंता, नरखेड व अर्जदार तर्फे श्री श्रीराम भातकुलकर हे उपस्थित होते. गैरअर्जदाराने सुनावणीच्या दिवशी त्यांचे अभिप्राय दाखल केले व त्याची प्रत अर्जदारास दिली, तेव्हा अर्जदाराने आपली बाजु मांडण्याकरीता मंचाला वेळेच्या मुदतीची मागणी केली.

८. दिनांक २५.०६.२०१० रोजी मंचात सुनावणीची कार्यवाही पुढे सुरू करण्यात आली. अर्जदाराचे असे म्हणणे होते की मिटर बदविल्यानंतर विद्युत देयके बरोबर येत आहे व जुन्या मिटरची चाचणी त्यांच्या समोर

करण्यात आली नाही. तसेच चुकीच्या वायरींग मुळे मिटरची नोंदी वाढत असल्याची शंका अर्जदाराने मंचासमोर दर्शविली. तेव्हा गैरअर्जदारा तर्फे श्री वांदीले, सहाय्यक अभियंता, नरखेड यांनी मंचाला सांगितले की मिटरची वायरींग बरोबर होती व अर्जदाराला घरातील अर्थिंग विषयी सांगण्यात आले होते, परंतु अर्जदाराने असे समजले की अर्थिंगची वायर मिटरमध्ये जोडण्यात आली आहे. तसेच मिटर बरोबर असुन त्यात कुठलाही दोष नाही.

९. मंचाने दोन्ही पक्षाचे म्हणणे एकुण घेतले. मिटर चाचणी अहवाल अर्जदारास मान्य नसल्यामुळे सुनावणीच्या दरम्यान दोन्ही पक्षांनी पुन्हा मिटरची चाचणी करण्याचे मान्य केले, व ती ०५.०७.२०१० रोजी करण्यात आली.

१०. दोन्हीही पक्षांचे म्हणणे सविस्तरपणे ऐकल्यानंतर व सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केल्यावर, मंचाचे असे मत आहे की अर्जदाराची मुख्य तक्रार ऑगष्ट २००९ ते डिसेंबर २००९ या काळात वाढीव विद्युत देयके आल्याबददल आहे. तक्रार कर्त्याला मिटर मध्ये दोष असल्यांची शंका होती व त्यामुळे विद्युत देयके जास्त येते असे वाटले. मिटर चाचणी विभाग काटोल येथे अर्जदारच्या मिटरची चाचणी घेण्यात आली, परंतु त्यावेळी अर्जदार अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नसल्यामुळे दिनांक ०५.०७.२०१० रोजी जुन्या मिटरची पुन्हा चाचणी घेण्यात आली. मीटर चाचणी अहवालाप्रमाणे मिटर दोष रहीत आहे. तेव्हा अर्जदारास देण्यात आलेले विद्युत देयक योग्य आहे असे मंचाचे मत आहे.

११. मंचाचे पुढे असेही मत आहे की तक्रारकर्ता हा स्वतः जेष्ठ नागरिक असुन त्यांच्या घरी फक्त त्यांची वृध्द् आई राहते, त्यांना देण्यात आलेले विद्युत देयकाची रक्कम ४२३०/– चे बिल एक रकमी भरता येणार नाही, असे त्यांचे म्हणणे स्विकारावे लागेल. तसेच अर्जदाराने सदर रक्कम भरण्याकरीता थकबाकी असलेल्या विद्युत देयकांच्या रकमेचा भरणा करण्याकरीता हप्त्यांची सुविधा देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

१२. तसेच गैरअर्जदाराने वेळोवेळी तक्रारीची दखल घेतल्याचे दिसुन येते व अर्जदाराने आर्थिक नुकसान झाल्याचे कुठलेही पुरावे मंचासमोर सादर न केल्याने त्यांची नुकसान भरपाईची मागणी मान्य करता येणार नाही.

दोन्हीही पक्षांचे म्हणणे सविस्तरपणे ऐकल्यानंतर व मंचात सादर केलेल्या कागदपत्राचा विचार केल्यानतंर मंच खालील आदेश देत आहे.

## आदेश

१. अर्जदारास देण्यात आलेले विद्युत देयके योग्य आह त्यामुळे थकीत असलेले विद्युत देयक तीन हप्त्यांत भरण्याचा आदेश देण्यात येत आहे.

२. अर्जदाराची नुकसान भरपाईची मागणी रद्द करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/– | सही/– | सही/– |
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चंद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |